# भा.कृ.अ.सं.— केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर

## * कापसाच्या २०१५—१६ हंगामासाठी देण्यात येणारा शेवटचा आठवडी सल्ला *

1- ज्याठिकाणी कापसाला ८—१० हिरवी बोंडे असतील व गुलाबी बोंडअळीचे प्रमाण २० टक्के प्रति २०—५० हिरवी बोंडे असतील अशा ठिकाणी सर्व बोंडाची वेचणी झाल्यानंतर पायरेथ्राईड या किटकनाशकाची फवारणी करून घ्यावी ज्यामुळे राहिलेले बोंडे गुलाबी बोंडअळीपासून वाचू शकतील. शेतकऱ्यांना सल्ला दिला जातो कि त्यांनी त्यांचे पीक जानेवारीपर्यंत काढून टाकावे.

2- कापसाच्या पिकाला पाणी व खत देऊन त्याचा कालावधी वाढवू नये कारण उशीरा येणाऱ्या बोंडामुळे गुलाबी बोंडअळीचे प्रमाण वाढते. उन्हाळयामध्ये घेतला जाणारा कापूस व खोडवा घेणे टाळावे ज्यामुळे गुलाबी बोंडअळीचे प्रमाण वाढणार नाही व बोंडअळीमध्ये प्रतिकारशक्ती वाढणार नाही.

3- पूर्ण वाढ झालेल्या बोंडाची वेचणी सकाळी १० वाजता करावी. कापसाला योग्य मोबदला मिळण्यासाठी त्याची वेचणी स्वच्छ केली पाहिजे. स्वच्छ कापूस, स्वच्छ पिशवीमध्ये ठेवल्याची खात्री करून घ्यावी. सुरूवातीला वेचणी केलेला कापूस व्यवस्थीत वाळविल्यानंतर स्वच्छ पिशवीत जतन करून ठेवावा. कापसाला ठेवण्यासाठी गणी बॅग्जचा वापर करू नये. वेचणी लवकरात लवकर पूर्ण करावी.

4- पिकाची फेरपालट करावी. ज्यामुळे किटकाची, रोगांची व तणांची जीवनप्रक्रिया बंद होण्यास मदत होते.

5- जुने साठवून ठेवलेले कापसाचे बियाणे हे गुलाबी बोंडअळीचे पुढच्या हंगामात येण्यासाठी कारणीभूत ठरू शकते त्यामुळे असे किडरहित कापसाचे बियाणे नष्ट करावे.

6- कुठल्याही प्रकारचा काडी कचरा, कीडरहित कापूस साठवून ठेवू नये. सर्व प्रकारचे कापसाचा काडी कचरा नष्ट करावा कारण तो किडयांच्या पुढील हंगामात येण्यासाठी कारणीभूत ठरू शकतो. तसेच कापसाचा काडी कचरा जाळून टाकण्याऐवजी त्याचा कंपोस्ट खत तयार करावा.

भा.कृ.अ.सं.— कें.का.सं.सं. ने कापसाचा आठवडी सल्ला दिल्याबद्दल धन्यवाद. योग्य प्रतिसाद दिल्याबद्दल सर्वांचे आभार वेचणीला एप्रिल महिन्यात उत्तर भारतात होणार आहे. पुढील सल्ला मार्च २०१६ महिन्याच्या तिसऱ्या आठवडयात दिला जाईल.

आई.सी.ए.आर.-सी.आई.सी.आर.
कापूस सल्लागार संघ